साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड
रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे
साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०४.०३.२०२६ | अंक नं. २७८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत ग्राहकांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

समता पतसंस्था
नो रिस्क, रिटर्न्स फिक्स
११००+ कोटींच्या ठेवी
ठेवींवर १०% पर्यंतचे व्याज मिळवा
लिक्विडिटी बेस प्रोटेक्शन स्कीम
अंतर्गत ठेवीदारांच्या ठेवी, पूर्णपणे सुरक्षित.
संपर्क : ७७२२ ०१० २२२
४० वर्षे ग्राहकांच्या विश्वासाची!

दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ 888/-*
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES
Since 1965
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

## भूमि अभिलेख कर्मचाऱ्यांचे 'कामबंद आंदोलन' सुरूच; मोजणीसह इतर कामेही पूर्णपणे 'ठप्प'

### अहिल्यानगर जिल्ह्यातील ३०० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांचा सहभाग

नगर - विविध प्रलंबित मागण्यांसाठी भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांनी २२ फेब्रुवारीपासून असहकार आंदोलन पुकारले होते. आता हे आंदोलन अधिक तीव्र करीत २ मार्चपासून कामबंद आंदोलन सुरु करण्यात आले आहे. या आंदोलनात अहिल्यानगर जिल्ह्यातील ३०० पेक्षा अधिक कर्मचारी तर राज्यभरातील ८ हजार कर्मचारी सहभागी झाले आहेत. त्यामुळे राज्यभरातील मोजणीसह इतर कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. दरम्यान महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे आज भूमि अभिलेख कर्मचारी कृती समितीशी विविध मागण्यांबाबत चर्चा करणार असून, त्यानंतर आंदोलनाची पुढील दिशा ठरविली जाणार आहे, अशी माहिती भूमि अभिलेख कर्मचारी संघटनेचे विभागीय अध्यक्ष रवी डिक्रूज यांनी सांगितले.

प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष

*(मजकूर व छायाचित्र पान २ वर)*

हिंदुजनसेवक
मान भगव्याचा अभिमान अहिल्यानगरचा
धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृति निमित्त देण्यात येणारा राष्ट्रीय स्तरावरचा धर्मवीर छत्रपती 'संभाजी महाराज' पुरस्कार अहिल्यानगर चे लाडके हिंदुत्ववादी आमदार श्रीमान संग्राम भैय्या जगताप (साहेब) यांना जाहीर करण्यात आला.
दिनांक १८ मार्च २०२६ रोजी शिरुर तालुक्यातील वढु या गावी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे
जे हिंदू कार्यासाठी व हिंदूंच्या रक्षणासाठी काम करतात त्यांनाच हा पुरस्कार देण्यात येतो.
- शुभेच्छुक -
ओंकार बाळासाहेब देशमुख
समस्त देशमुख परिवार
अहिल्यानगर.

शुभकार्यासाठी
भारत बॅण्ड
बॅण्ड,मावळास्वागत, मौंजमुलासाठी पालखी मिळेल.
संपर्क : अतुल देवचके
9822075421

अकोले तालूक्यातील सुप्रसिद्ध
इंद्रायणी तांदूळ मिळेल
ध्येय अॅग्रो
9623576711

विकणे / भाड्याने देणे
माळीवाडा शहराच्या मध्यवस्ती मध्ये सुमारे १५०० स्क्वेअर फुट एकत्र असे तीन शॉप विकणे अथवा भाड्याने देणे
- संपर्क -
विठ्ठल इलेक्ट्रीकल्स्
8983001515
7083280539

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्समर्ल्स पाहिजे. आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

॥ सुमनांजली ॥

आपल्या स्मृती, आपल्या आठवणी
कायम आमच्या हृदयात घर करून राहतील

दोस्तीच्या दुनियेतील राजा



स्व. सुनिल (मामा) वसंतलालजी भळगट
(कुंभळीवाला)
(संथारा पुर्णाहुती : मंगळवार, ३ मार्च २०२६)
॥ परमेश्वर आपल्या आत्म्यास चिरशांती देवो हीच प्रार्थना ॥

- दुःखांकित -

| | | | |
|---|---|---|---|
| शैलेश (पिंटु) चोपडा | दिनेश भंडारी | मनोज सुवालालजी गुंदेचा | राहुल काठेड |
| अॅड. अतुल गुगळे | अमृत मुथियान | अतुल मुथा | दिनेश चोपडा |
| विशाल वालकर | जितेंद्र नहार | आनंद भंडारी | निखिल नहार |
| राजेंद्र रासने | सतिष रासने | संजय खंडेलवाल | रुपेश भंडारी |
| किशन कल्याणी | शशिकांत शिंदे | यासर तांबटकर | अशोक उपाध्ये |

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## सावेडी उपनगरात घरातून चोरी; रोख रकमेसह सोन्याचे दागिने लंपास

नगर – एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी रोख रकमेसह सोन्या चांदीचे दागिने असा २ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना सावेडी उपनगरातील तांबटकर मळा परिसरात ममता गस गोडावून जवळ घडली आहे. या प्रकरणी गोविंद बलराज बेहेल यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी बेहेल हे वैद्यकीय उपचारासाठी नाशिक येथे गेले होते, त्यामुळे त्यांचे घर १ मार्च रोजी सकाळी ११ ते ३ मार्च रोजी सकाळी ७.४५ पर्यंत बंद होते. याच संधीचा फायदा घेऊन चोरट्यांनी घराचा कडी–कोंडा तोडून आत प्रवेश केला. घरामध्ये ठेवलेली ८० हजार रुपयांची रोख रक्कम, सोन्याच्या अंगठ्या, मंगळसूत्र, कर्णफुले, चांदीचे विविध दागिने व इतर मौल्यवान वस्तू असा एकूण २ लाख ९५ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला.

घराची देखभाल करणाऱ्या व्यक्तीला दरवाजाचे कुलूप तोडल्याचे निदर्शनास आल्यावर ही चोरी उघडकीस आली. याबाबत माहिती मिळताच बेहेल यांनी नातेवाईकांना बोलावून पोलिसांना कळवले. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी ठसे तज्ज्ञांच्या मदतीने तपासणी केली आहे. गोविंद बेहेल यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बीएनएस कलम ३३१ (३), ३३१ (४), ३०५ (अ) नुसार गुन्हा दाखल केला आहे. चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

## भूमि अभिलेख कर्मचाऱ्यांचे 'कामबंद आंदोलन' सुरूच

(पान १ वरुन)

वेधण्यासाठी राज्यभरासह नगर येथे बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. सावेडीतील भूमि अभिलेख कार्यालयासमोर बुधवारी सकाळी कर्मचाऱ्यांनी निदर्शने केली. भूमि अभिलेख कर्मचारी कृती समितीच्या वतीने हे आंदोलन टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत असून मागण्या मान्य न झाल्याने २ मार्चपासून कामबंद आंदोलन सुरु करण्यात आले आहे.

भूमि अभिलेख विभागातील सर्वेअर यांना पोलिस बंदोबस्ताशिवाय मोजणीचे काम करावे लागते. हे काम अत्यंत जोखमीचे असल्याचे अलिकडील काही गंभीर घटनांवरून स्पष्ट झाले आहे. तसेच विभागातील कर्मचाऱ्यांचे कामकाज हे लिपीक संवर्गाचे नसून तांत्रिक दर्जाचे आणि क्षेत्रीय स्तरावरील धोकादायक स्वरूपाचे आहे. याबाबत शासन–प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी वर्षानुवर्षे पाठपुरावा करूनही दुर्लक्ष होत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर २२ फेब्रुवारीपासून भूमि अभिलेख कर्मचारी कृती समितीने संपूर्ण राज्यात असहकार आंदोलन सुरू केले होते. त्यामध्ये केवळ कार्यालयीन कामकाजाचा निपटारा करणे, मोजणी प्रकरणांतील अभिलेख अद्ययावत करणे, अर्जित रजा घेणे तसेच बेमुदत कामबंद आंदोलन अशा विविध टप्प्यांतून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा, अशी मागणी भूमि अभिलेख कर्मचारी संघटनेचे नाशिक विभागीय अध्यक्ष रवी डिक्रूज, भूमि अभिलेख कर्मचारी संघटनेचे अहिल्यानगरचे सल्लागार उमेश कोदे, अहिल्यानगरचे सहसचिव प्रविण बोरुडे, संघटक प्रदीप अवचर, मिलिंद भिंगारदिवे, संग्राम लवांडे, शशिकांत धस, अविनाश ठोकळ आदी कर्मचाऱ्यांनी केली आहे.



अहिल्यानगर भूमि अभिलेख कार्यालयासमोर निदर्शने करताना भूमि अभिलेख कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी.





महानगरपालिकेच्या आवाहनानंतरही अहिल्यानगर शहरांमध्ये रस्त्यावर कचऱ्याचे ढिगारे दिसून येत आहे. दाणेडबरा व सर्जेपुरातील हे चित्र. (छाया – धनेश कटारिया)

## नगर शहरात सर्वत्र रस्त्यावरच कचऱ्याचे ढिगारे

### पालिकेच्या दैनंदिन कचरा संकलनाचा उडाला बोजवारा

नगर – अहिल्यानगर महापालिकेने मोठ्या उत्साहात शहरात स्वच्छता अभियान हाती घेतले होते. शहरातील रस्त्यांवर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर महापालिकेच्यावतीने दंडात्मक तसेच फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आली होता. मात्र, त्यानंतरही शहरात सर्रास कचऱ्याचे ढीग आढळून येत आहेत. नागरिक रस्त्यावर, रस्त्याकडेला कचरा आणून टाकत असून, महापालिकेच्या स्वच्छता विभागाकडूनही हा कचरा उचलला जात नाही. त्यामुळे महापालिकेचे स्वच्छता अभियान केवळ फोटोसेशन पुरते होते का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

महापालिकेच्यावतीने स्वच्छ अहिल्यानगर अभियान हाती घेण्यात आले आहे. या अभियानांतर्गत शहरातील कचरा उचलण्यासाठी सकाळी व संध्याकाळी अशा दोन वेळा घंडागाड्या शहरात धावत आहेत. नागरिकांनी घरातील कचरा रस्त्यावर आणून टाकू नये, असे आवाहन महापालिकेच्यावतीने वारंवार करण्यात येत आहे. त्यानंतरही काही नागरिक रस्त्यावरच कचरा आणून टाकत असल्याचे महापालिकेच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे महापालिकेने रस्त्यावर कचरा आणून टाकणाऱ्या नागरिकांवर थेट दंडात्मक कारवाई करण्याचा व गुन्हा दाखल करण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांचे फोटो पाठवा आणि रोख बक्षिस जिंका अशी घोषणाही केली होती. मात्र, त्यानंतरही शहरात कचऱ्याचे ढिगारे दिसून येत आहेत. शहरातील सर्जेपुरा, दाणेडबरा, कुष्ठधाम रोड, मार्केट यार्ड अशा विविध ठिकाणी रस्त्यावर कचऱ्याचे ढिग दिसून येतात. मागील काही महिन्यात शहरातील सर्व रस्ते झाडून स्वच्छ करणाऱ्या स्वच्छता विभागाला मात्र, हा कचरा उचलण्याचा सोयीस्करपणे विसर पडला आहे की काय, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

याबाबत महापालिकेची प्रतिक्रिया घेण्यासाठी महापालिकेच्या स्वच्छता विभागाशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

## शेतात गवत आणायला गेली पुन्हा परतलीच नाही; दुसऱ्या दिवशी विहिरीत आढळला तरुणीचा मृतदेह

नगर – बहिणींच्या सोबत शेतात गवत आणायला गेलेल्या १६ वर्षीय तरुणीचा विहिरीत पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना ३ मार्च रोजी सायंकाळी वडगाव गुप्ता (ता. नगर) शिवारात उघडकीस आली आहे. वर्षा जनार्दन जाधव (वय १६, रा. वडगाव गुप्ता, ता.नगर) असे मयत तरुणीचे नाव आहे. २ दिवसांपासून ती बेपत्ता होती. अखेर तिचा मृतदेह विहिरीत आढळून आला आहे.

मयत वर्षा ही तिची बहिण व चुलत बहिणी अशा चौघीजणी २ मार्च रोजी दुपारी ४ च्या सुमारास घरापासून अर्धा किलोमीटर असलेल्या शेतात जनावरांसाठी गवत आणण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी गवत काढत असताना वर्षा हिने बहिणींना मी काही वेळात आले असे सांगून ती काही अंतरावर निघून गेली होती. बराच वेळ झाला तरी ती परत न आल्याने बहिणींनी तिची शोधाशोध करत कुटुंबियांना माहिती दिली.

कुटुंबीयांनी ही तिचा शोध घेतला मात्र ती न सापडल्याने शेवटी एमआयडीसी पोलिस ठाण्यात मिसिंगची तक्रार देण्यात आली. पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला करत तिचा शोध सुरु केला होता. दरम्यान नातेवाईक तिचा शोध घेत असताना ३ मार्च रोजी सायंकाळी शेतातील विहिरीत तिचा मृतदेह आढळून आला आहे. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत वर्षा ही इयत्ता १० वी ची परीक्षा देत होती, तिच्या पश्चात आई, वडील, १ भाऊ, २ बहिणी असा परिवार आहे.

## शहराबाहेर नवीन बाजारपेठ निर्मितीचा व्यापाऱ्यांनी विचार करावा

### आडतेबाजार मर्चंट असोसिएशनकडे मागणी

नगर – आगामी पाच दहा वर्षांमध्ये शहराचा होणारा विस्तार विचारात घेऊन व्यापारी बांधवांनी शहराजवळ नवीन बाजारपेठ निर्माण करण्याचा विचार करावा, अशी मागणी अभय ललवाणी यांनी आडतेबाजार मर्चंट असोसिएशनकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात श्री. ललवाणी यांनी म्हटले आहे की, आपल्या अहिल्यानगर शहराचा विस्तार दिवसेंदिवस वाढत आहे. उपनगरांमध्ये देखील नागरी क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले आहे. अहिल्यानगरची बाजारपेठ सध्या डाळमंडई – आडतेबाजार परिसरात आहे. सद्यस्थितीमध्ये या बाजारपेठेची जागा कमी पडत आहे. त्यामुळे बाजारपेठेत बाहेरून येणाऱ्या ग्राहकांना वाहतूक कोंडी सारख्या समस्येला सामोरे जावे लागते. या समस्येमुळे बाजारपेठेचा सध्याचा व्यवसाय मर्यादित झाला आहे.

वास्तविक नगर बाजारपेठेची क्षमता फार मोठी आहे. व्यापारी बांधवांनी एकत्र येऊन शहराबाहेर नवीन बाजारपेठ उभारण्याचा विचार केल्यास बाजारपेठेची उलाढाल निश्चीतच दहापटीने वाढू शकते. प्रत्येक व्यापारी दुकानदाराला व्यवसायासाठी मोठे मोठे प्लॉट, गोडाऊन, प्रशस्त पार्किंग नवीन बाजारपेठेमध्ये उपलब्ध होऊ शकतात. आजूबाजूच्या गावांमधून तालुक्यांमधून येणारे ग्राहक वाढू शकतात. मुख्य म्हणजे सध्याच्या बाजारपेठेतील वाहतूक कोंडीची समस्या देखील सुटू शकते. ज्याप्रमाणे नेप्ती कांदा मार्केट विकसित झाले, तेथील व्यापार अनेक पटींनी वाढला, त्याप्रमाणेच नवीन बाजारपेठेचा विस्तार व उलाढाल वाढू शकते. त्यामुळे या सूचनेचा प्राधान्याने विचार करावा, अशी मागणी श्री. ललवाणी यांनी केली आहे.

## राजलबाई लोढा यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – सारसनगर येथील रहिवासी श्रीमती राजलबाई सुभाष लोढा (पुंडीवाला, वय ७७) यांचे ४ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मनोज, निलेश यांच्या त्या मातोश्री तसेच गौरव, देबेन, विवान यांच्या आजी होत.

## संजय देवकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – दातरंगे मळा नालेगाव येथील रहिवासी संजय निवृत्ती देवकर (वय ४५) यांचे ४ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, भाऊ, भावजय, पत्नी, २ मुली असा परिवार आहे.

## कांताबाई भळगट यांचे दु:खद निधन



नगर – जैन पार्क, पूनम मोतीनगर मधील रहिवासी श्रीमती कांताबाई मनसुखलाल भळगट (वय ८६ वर्षे) यांचे ३ मार्च रोजी दुःखद निधन झाले. त्या अतिशय धार्मिक आणि मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या.

त्यांच्या मागे मुलगा सीए महेश, सून डॉ.दिपा, नातू अमेय, ३ मुली, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

## बंदी असलेल्या ४ हजार किलो मांगूर माशांचा ट्रक पकडला; चौघांना ताब्यात घेत २९ लाखांचा मुद्देमाल पोलिसांकडून जप्त

नगर – राज्यात प्रतिबंधित असलेल्या मांगुर माशांच्या बेकायदेशीर वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने शिर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी ४००० किलो मांगुर मासे आणि एक ट्रक असा एकूण २९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून चार आरोपींना ताब्यात घेतले आहे.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक मेढे, पोलीस अंमलदार राहुल द्वारके, शाहिद शेख, फुरकान शेख, राहुल डोके, सुनील माळवदकर, प्रशांत राठोड, सतीश भवर आणि चालक उमाकांत गावडे यांच्या पथकाने ही कारवाई केली.



राज्यात बंदी असलेल्या मांगूर माशांचा ट्रक पकडल्यानंतर आरोपींच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

मनमाड हायवे रोडवरील निमगाव बायपासवरून एका ट्रकमध्ये (क्र.डब्ल्यू बी २५ एम ५०२३) केंद्र सरकारने प्रतिबंधित केलेले मांगुर मासे नेले जात असल्याची खात्रीशीर माहिती पथकाला मिळाली. स्थानिक गुन्हे शाखेने तातडीने शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रणजित गलांडे, सागर काळे व त्यांच्या पथकाला सोबत घेऊन निमगाव बायपास रोडवर सापळा रचला. संशयित ट्रक अडवून त्याची झडती घेतली असता, त्यामध्ये प्रतिबंधित मांगुर मासे आढळून आले.

या प्रकरणी पोलिसांनी चार जणांना ताब्यात घेतले असून त्यांची नावे स्वप्न नियम डे (वय ३६, रा. वामनगंज, जि. बाराशाद, पश्चिम बंगाल), मकबुल रौफ सरदार (वय ३१, रा. मसलंदापूर, जि. नॉर्थ २४ परगणा, पश्चिम बंगाल), कुतुब आयुब मंडल (वय ३५, रा. बदुडीया, जि. नॉर्थ २४ परगणा, पश्चिम बंगाल) आणि मृत्युंजय मुकुल विश्वास (वय २७ , रा. हाबरा, जि. नॉर्थ २४ परगणा, पश्चिम बंगाल) अशी आहेत. चौकशीदरम्यान आरोपींनी हे मासे पश्चिम बंगालमधून आणले असून ते मिराज यांच्याकडून घेऊन खोपोली येथील भाई नावाच्या व्यक्तीला देण्यासाठी जात असल्याचे सांगितले.

मत्स्य विकास अधिकारी प्रतिक्षा सुधाकर पाटेकर यांनी घटनास्थळी येत या माशांची पाहणी केली आणि ते प्रतिबंधित मांगुर मासे असल्याचा अभिप्राय दिला. पोलिसांनी ४ लाख रुपये किमतीचे ४००० किलो मासे आणि २५ लाख रुपयांचा ट्रक असा एकूण २९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जप्त केलेले मासे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून नष्ट करण्यात आले आहेत.

या प्रकरणी मत्स्य विकास अधिकारी प्रतिक्षा पाटेकर यांच्या फिर्यादीवरून शिर्डी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३, २७५, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सौर कृषी पंप देण्याच्या आमिषाने ४० शेतकऱ्यांची फसवणूक; ५ लाख ४७ हजार रुपये घेवून झाले गायब

### नगरच्या तिघांवर गुन्हा दाखल

नगर – शासकीय योजनेतून सौर कृषी पंप मिळवून देण्याच्या नावाखाली केडगावच्या दोघांनी आणि श्रीगोंदा येथील एकाने श्रीरामपूर येथील सेतू चालकाकडून ४० शेतकऱ्यांचे अर्ज भरून घेवून त्यांच्या कडून सुमारे ५ लाख ४७ हजार रुपये जमा केले त्यानंतर अनेक महिने उलटूनही पंप बसवून न देता आणि त्या शेतकऱ्यांच्या नावासमोर अगोदरच वापरलेल्या शेतकऱ्यांचे ग्राहक क्रमांक टाकून या शेतकऱ्यांची व महावितरणची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी तिघांवर ३ मार्च रोजी श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ओंकारेश्वर राजेंद्र रासकर, किरण बोरुडे (दोघे रा. केडगाव, अहिल्यानगर) व संदीप बनकर (रा. श्रीगोंदा) असे गुन्हा दाखल झालेल्या तिघांची नावे आहेत. याबाबत संदीप म्हाळू राऊत (वय ३५, रा. निपाणी वडगाव, ता. श्रीरामपूर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे सेतू केंद्र आहे. त्यांच्या कडे परिसरातील सुमारे ४० शेतकऱ्यांनी सौर कृषी पंप मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज केले होते. या तिघांनी सन २०२४ मध्ये फिर्यादी यांच्याशी संपर्क साधून आपण सोलर कंपनीचे सबडिलर असल्याचे सांगत शेतकऱ्यांना सौर पंप मिळवून देण्याचे अमिष दाखवत या ४० शेतकऱ्यांकडून आगाऊ रकमा जमा करायला लावल्या. फिर्यादी यांनी शेतकऱ्यांकडून सुमारे ५ लाख ४७ हजार रुपये जमा करून रोख आणि ऑनलाईन स्वरुपात या तिघांकडे दिली. त्यानंतर फेब्रुवारी २०२५ पर्यंत एकाही शेतकऱ्याला सौर कृषी पंप बसवून दिला नाही. फिर्यादी यांनी त्यांना अनेकदा संपर्क करुनही आरोपींनी टाळाटाळ केली.

त्यानंतर फिर्यादी यांनी अधिक चौकशी केली असता आरोपींनी या शेतकऱ्यांच्या नावासमोर अगोदरच वापरलेल्या शेतकऱ्यांचे ग्राहक क्रमांक ऑनलाईन टाकलेले असल्याचे आढळून आले. या तिघांनी आपणासह ४० शेतकऱ्यांची आमी महावितरण कंपनीचीही फसवणूक केल्याचे निदर्शनास आल्यावर संदीप राऊत यांनी याबाबत श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी तिघांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१८ (२), ३१८ (४), ३ (५) प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

### फसवणूक टाळण्यासाठी खबरदारी घेण्याची गरज

शेतीसाठी दिवसा वीज उपलब्ध व्हावी व वीज खर्चात बचत व्हावी यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांसाठी ९० ते ९५ टक्के अनुदानावर सौर कृषी पंप योजना राबविली जात आहे. सौर पंप मिळण्यासाठी अर्ज ऑनलाईन केव्हा व कसा करायचा याबाबत माहिती होत नसल्याने अनेक शेतकरी गरज असुनही लाभापासून वंचित आहेत. अशा शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा काही जण उठवत असून शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करत असल्याच्या घटना अनेक ठिकाणी उघडकीस येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी याबाबत अधिक जागरूकता दाखवून जवळच्या महावितरण कार्यालयाशी संपर्क साधून योजनेची योग्य माहिती घेण्याची गरज आहे.

## रसवंती चालविण्यावरून महिलेसह भावाला मारहाण

नगर – नगर मनमाड रोडवर असलेल्या हुंडेकरी शो रूम समोर रसवंती गृह चालविण्यावरून झालेल्या वादातून एका महिलेसह तिच्या भावाला मारहाण झाल्याची घटना ३ मार्च रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सोनल सुरेश गोरे (रा. बोल्हेगाव फाटा) यांचे नगर मनमाड रोड वर असलेल्या हुंडेकरी शो रूम समोर रसवंती गृह आहे. ३ मार्च रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास आरोपी कुमार काशीनाथ शिंदे, राजेंद्र काशीनाथ शिंदे आणि संदेश मोहिते (सर्व रा. जाधव पेट्रोल पंपाजवळ, कल्याण रोड)हे चारचाकी गाडीतून आले. त्यांनी 'येथे उद्यापासून दुकान चालवायचे नाही' अशी धमकी देत दुकानातील साहित्याची तोडफोड केली.

त्यानंतर पुन्हा येऊन आरोपींनी फिर्यादी सोनल गोरे आणि त्यांचे भाऊ प्रवीण गोरे यांना वस्तारा व उसाने मारहाण केली. या हल्ल्यात दोघेही जखमी झाले असून, आरोपींनी त्यांना जीवे मारण्याची धमकी देखील यावेळी देण्यात आल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. याप्रकरणी सोनल गोरे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी तिन्ही आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.



**हनुमान चालिसा पाठ**

गुरुवार दि. ५/३/२०२६
रात्री ८.३० ते १०.३०

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**आदेश्वर मेन्स वेअर,** बिजनेस सेंटर समोर, प्रोफेसर चौक, अमित अरुण पारख ९८२३५१५३१६

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**गौरव कैलास शिंदे,** यश बंगला, राजमाता कॉलनी, पावन गणपती मंदिरा शेजारी, सारसनगर, गौरव शिंदे ९७६३६३७३४, कैलास शिंदे ९३७०७०२०७०

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**

**विचार भारती आयोजित, रविंद्र मुळे**
प.पू.बाळकृष्ण महाराज तथा सच्चिदानंद महाराज समाधी मंदिर, सारसनगर ९४२२२२१५७०

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**श्री पावन गणेश मंदिर,** श्री. रासकर परिवार, बारातोटी कारंजा, माळीवाडा

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**

**श्री रामदेवरा दरबार,** सारसनगर

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री– पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या

**सेक्स समस्या**

वाईट सवयीचे दुष्परिणाम / स्वप्नदोष / धातुपात / शीघ्रपतन / असमाधान
कमजोरी / शुक्राणुंची कमी / गुप्तरोग / त्वचारोग / नपुंसकत्व / मानसिक नैराश्य

**डॉ. अभय मुथा** (मनोलैंगिक विकार तज्ञ)
२९ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार

ISO मानांकन प्राप्त **सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक**
विनायकनगर, नगर–पुणे रोड, अहिल्यानगर

संपर्क: 94 22 23 90 13 ▪ www.sextreatment.in

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### आरोग्यदायी खजूर

आपणास माहीत आहे का, खारीक आणि खजूर एकाच झाडांपासून तयार होतं. दोघांची प्रकृती उष्ण असते. दोन्ही शरीरास बळकट बनविण्यासाठी विशेष भूमिका बजावतात. उष्ण प्रकृतीच्या असल्यामुळे हिवाळ्यात त्यांची उपयुक्तता वाढते. हिवाळ्यात बऱ्याच बायकांना मासिक पाळीशी निगडित काही त्रास उद्भवतात, त्यासाठी खारीक फायदेशीर आहे. खारीक खाल्ल्याने मासिक पाळी मोकळी होते आणि कंबर दुखी मध्ये देखील आराम मिळतो. खारीक खाल्लयाने लघवीचा आजार बरा होतो. म्हातारपणात लघवी वारंवार येत असल्यास तर दिवसातून २ खारीक खाणे फायदेशीर असतं. खारीक घातलेले दूध घेणे देखील फायदेशीर असणार. आपले मुलं झोपेत बिछान्यावरच लघवी करतं असल्यास त्याला देखील रात्री खारकेचं दूध द्या. हे शक्ती देतं. कमी रक्तदाब असणारे रुग्ण ३ - ४ खारका किंवा खजूर कोमट पाण्यामध्ये धुऊन बियाणं काढून टाका. हे गायीच्या गरम दुधात उकळवून घ्या. या उकळलेल्या दुधाला सकाळ-संध्याकाळ प्या. काहीच दिवसात कमी रक्तदाबाचा त्रास दूर होईल.

## पाककला

### मखाना पराठा

**साहित्य** : एक कप मखाना, दोन उकडलेले बटाटे, १ चमचा मीठ, १ चमचा बारीक चिरलेली हिरवी मिरची, १ चमचा बारीक चिरलेली कोथिंबीर, १ चमचा तूप

**कृती** : सर्वात आधी मखान्यापासून पीठ तयार करावे. हे करण्यासाठी, तेल किंवा तूप न घालता मखाना हलके भाजून घ्या. आता, मखाना थोडा थंड झाल्यावर, ते बारीक बारीक वाटून घ्या. एका भांड्यात उकडलेले बटाटे ठेवा आणि ते पूर्णपणे मॅश करा. आता बटाट्यांमध्ये मखानाचे पीठ मिसळा. चवीसाठी बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या, मीठ आणि कोथिंबीर घाला. हे सर्व साहित्य नीट मिसळा आणि पीठ मळून घ्या. जर ते खूप घट्ट वाटत असेल तर पाणी घालून पीठ बनवा. हवे असल्यास, तुम्ही पाण्याऐवजी थोडे दही देखील घालू शकता. यामुळे मखाना पराठे आणखी मऊ होतील. आता पीठ झाकून ठेवा आणि १० मिनिटे स्थिर होऊ द्या. तयार केलेल्या पीठाचे छोटे गोळे लाटून घ्या. पॅन गरम करा आणि त्यावर तूप लावा. आता, त्यांना दोन्ही बाजूंनी पराठ्यासारखे बेक करा. तर चला तयार आहे स्वादिष्ट आणि आरोग्यदायी मखाना पराठे.

## वास्तू

### रोज कपडे धुत असाल तर

शनिदेवाला कर्म आणि न्यायाचे देवता मानले जाते. शनिवारी कपडे धुवू नयेत, अन्यथा शनिदेव रागावतात आणि जेव्हा जेव्हा शनिदेव रागावतात तेव्हा सर्वात आधी घरात गरिबी येते असे म्हटले जाते. अशा परिस्थितीत, जर तुम्हालाही शनिवारी कपडे धुण्याची सवय असेल तर ते टाळा. जर तुम्हाला गरिबीऐवजी संपत्ती आमंत्रित करायची असेल तर सोमवार, मंगळवार, शुक्रवार आणि रविवारी कपडे धुवा. हे दिवस कपडे धुण्यासाठी शुभ मानले जातात.

## सौंदर्य

तुपात व्हिटॅमिन ए, ई, के आणि अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात जे त्वचेसाठी खूप फायदेशीर आहेत. यामुळे त्वचा निरोगी आणि चमकदार बनते. पायाच्या तळव्याला देसी तुपाने मसाज केल्याने रक्ताभिसरण वाढते, ज्यामुळे त्वचेवर नवीन पेशी तयार होतात आणि रंग साफ होतो.

## सल्ला

वाटलेले मसाले नेहमीच मंद आचेवर शिजवावे, या मुळे रंग आणि चव चांगली येते. ग्रेव्ही चविष्ट बनविण्यासाठी त्यात थोडी साखर मिसळा. **संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ५ मार्च २०२६

**संत तुकाराम महा. बीज, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन कृष्णपक्ष, उत्तरा ०८।१८, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**वृषभ** : खाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे.

**मिथुन** : कला क्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. आपणास नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे. मानसन्मानात वाढ होईल.

**कर्क** : एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न कराल. यशस्वी व्हाल.

**सिंह** : आपल्या जुन्या लोकांबरोबर किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल.

**कन्या** : कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.

**तूळ** : इतर लोकांना आपल्या स्वतःच्या आवश्यकता व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

**वृश्चिक** : आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल.

**धनु** : मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल.

**मकर** : आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील.

**कुंभ** : आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल. मागील उधारी वसुल होईल.

**मीन** : आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल.

## शब्दगंध क्र. ७३८० सौ.शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ७३७९ चे उत्तर**



**आडवे शब्द :-** १) जिल्ह्याचे ठिकाण असलेले पश्चिम महराष्ट्रातील एक शहर ३) उलटा; मागे ५) एक पक्वान्न; खीर ७) धागा; तंतू; दोरा; सूत ९) उंट हकणारा १२) पोट फुगल्यामुळे लागणारी तिडीक १४) सोंगटी १६) उलटी होईल असे १८) पायताण; वहाण १९) हाक २०) खाण्याची किंवा जेवण्याची मानसिक व शारीरिक स्थिती; क्षुधा २२) शेळीचे पिलू २३) शरीक; समाविष्ट २४) वेगाने वाहणारी हवा; वारा; वात

**उभे शब्द :-** १) देवापुढे सायंकाळपुरता लावलेला मंद ज्योतीचा दिवा २) खेळ; क्रीडा ३) वेळ; अवकाश; विलंब ४) पूर्वीच्या काळातील एक लेखणी ६) एका हाताची ओंजळ ८) थोडेसे कडू; निष्ठावान १०) वानराची मादी ११) माणूस; कोणत्याही प्राण्यातील पुरुष जात १३) लढाईचे मैदान; युद्धक्षेत्र; रणांगण १५) जोराने फुटून बाहेर आलेला १७) एक पक्षी; कावळा; काग; वायस १८) येरझार; फेरी; चक्कर १९) ओढा वगैरेवर बांधलेला तात्पुरता पूल २१) ओढा; रोख; झोक २२) राग; त्वेष; खोपटी

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : श्रेष्ठ जीवनाचा आधार म्हणजेच सुयोग्य विचार होय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### गिझर वापरताना कोणती काळजी घ्यावी?

सध्या हिवाळ्याचा हंगाम सुरू आहे आणि जवळजवळ प्रत्येक घरात गिझरचा वापर केला जातो. गिझर हे आपल्या दैनंदिन जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. हिवाळ्यात पाणी गरम करण्यासाठी गिझरचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. तथापि, जर ते योग्यरित्या वापरले नाहीत तर ते एक मोठा धोका निर्माण करू शकतात.

गिझरच्या वापराशी संबंधित काही सामान्य चुका आणि त्यांचा सुरक्षित आणि योग्य वापर कसा करायचा ते पाहूया. गिझर जास्त काळ चालू ठेवल्याने अनेकदा वापरल्यानंतर ते बंद केले पाहिजे हे विसरले जाते. गिझर सतत चालवल्याने केवळ वीज बिलच वाढत नाही तर पाण्याची गुणवत्ता देखील खराब होते. शिवाय, गिझरच्या आत पाणी जास्त काळ गरम केल्याने दाब वाढतो, ज्यामुळे गिझर फुटण्याचा धोका वाढतो.

मुले उत्सुक असतात आणि अनेकदा गीझरला स्पर्श करण्याचा प्रयत्न करतात. गीझर हे विद्युत शक्तीवर चालणारे असतात आणि त्यांना स्पर्श केल्याने विजेचा धक्का बसू शकतो. म्हणून, गीझर नेहमी मुलांच्या आवाक्याबाहेर ठेवा.

हे एक तांत्रिक काम आहे आणि ते फक्त प्रशिक्षित इलेक्ट्रिशियनच करू शकते. स्वतः गीझर दुरुस्त करण्याचा प्रयत्न केल्यास गंभीर अपघात होऊ शकतो.

जर तुमचा गीझर खराब झाला असेल किंवा त्यातून कोणताही विचित्र आवाज येत असेल तर त्याचा वापर थांबवा.

सदोष गीझरमुळे विजेचा धक्का किंवा स्फोट होण्याचा धोका असतो. गीझरला कधीही पाण्याच्या संपर्कात येऊ देऊ नये. यामुळे शॉर्ट सर्किटचा धोका निर्माण होऊ शकतो. गीझरशी संबंधित सुरक्षा टिप्स नेहमी अर्थिंगसह गीझर बसवा. गीझर नियमितपे स्वच्छ ठेवा. गीझरला कोणत्याही प्रकारचा धक्का देऊ नका. गीझरजवळ ज्वलनशील पदार्थ ठेवू नका. प्रशिक्षित इलेक्ट्रिशियनकडूनच गीझर बसवा. गीझर हे आपल्या दैनंदिन जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहेत, परंतु त्यांचा वापर करताना आपण काळजी घेतली पाहिजे.

### सोनेरी खार

अनेक वर्षांपूर्वी जंगलात एका झाडावर एक खार राहत होती. ती झाडाच्या फांद्यांवर उडी मारत असे. ती झाडावरून खाली उतरून त्याचे धान्य चोचत असे. खाल्ल्यानंतर ती झाडावर परत येत असे. एके दिवशी, खारीने विचार केला, मी जंगलातील अन्न खाऊन बराच काळ लोटला आहे. शहरात का जाऊ नये? खार शहरात जाण्यासाठी रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर बसली. थोड्याच वेळात एक ट्रक तिथून गेला.

खारीने ट्रकवर उडी मारली. ट्रकमध्ये भाज्या भरलेल्या होत्या, ज्या गावातून शहरात नेल्या जात होत्या. खारीने आनंदाने ट्रकमधील भाज्या खाल्ल्या आणि शहरात पोहोचली. तिला पुन्हा भूक लागली. ती पुढे चालू लागली. एका ठिकाणी होळीसाठी रंग तयार केले जात होते. दोन मोठ्या ड्रममध्ये चांदी आणि सोनेरी रंगाचे द्रावण होते. खारीला वाटले की ते काहीतरी खाण्यायोग्य आहे. ती ड्रमच्या काठावर बसली आणि ड्रममध्ये पडली. एका माणसाने खारीला बाहेर काढले. खार खूप घाबरली. थोड्या वेळाने, रंग सुकू लागला.

खार उठली आणि हळू हळू पुढे चालू लागली. चालत असताना, तिने मागे वळून पाहिले आणि पाहिले की तिचे संपूर्ण शरीर सोन्याने मढवलेले आहे. खार खूप आनंदी झाली आणि जंगलात गेली. जंगलातील सर्व प्राणी तिला पाहून आश्चर्यचकित झाले. तेवढ्यात, एक कबुतर तिच्याकडे आले आणि विचारले, खार, तू कुठून आलीस?

खारीने उत्तर दिले, मी एका दूरच्या परीकथेतून आहे. तिथे सर्व प्राणी सोन्याचे बनलेले आहे. सर्व प्राणी, तिला पाहुणे मानून तिची काळजी घेऊ लागले. त्यांनी तिच्यासाठी विविध फळे आणि धान्ये आणली. खार आनंदित झाली. तिने ते सर्व खूप आनंदाने खाल्ले.

एके दिवशी, खार हिरव्या गवतावर उड्या मारत खेळत होती. अचानक आकाशात काळे ढग जमले आणि मुसळधार पाऊस पडू लागला. पावसाने तिचा सोनेरी रंग धुवून टाकला आणि तिचा खरा रंग दिसू लागला. पाऊस थांबल्यावर सर्व प्राणी तिच्याकडे आले. त्यापैकी एक, कोल्हा, म्हणाला, बंधूंनो, खारीने प्राण्यांना मूर्ख बनवले आहे. तिला शिक्षा झाली पाहिजे.

खार ओरडली, नाही, मी खरे सांगत आहे. येथे अन्न खाल्ल्याने माझा रंग फिका पडला आहे. कोणत्याही प्राण्याला तिच्यावर विश्वास नव्हता. जंगलाचा राजा सिंह तिथे आला. त्याला पाहून खार थरथर कापू लागली. सिंहाने विचारले तेव्हा खारीने त्याला सर्व काही सांगितले. हे ऐकून सर्व प्राणी हसले. सिंहही हसला. तो म्हणाला, ठीक आहे, आम्ही तुम्हाला माफ करतो, पण तुम्हाला वचन द्यावे लागेल की तुम्ही पुन्हा शहरात जाणार नाही. खार म्हणाली, महाराज, आजनंतर मी कुठेही जाणार नाही. मग सर्व प्राणी आपापल्या मार्गाने निघून गेले.

तात्पर्य : नेहमी खरे वागावे; कधीही कोणालाही फसवू नये.

## जीवन का अमृत (भाग १)



यह हजूर बाबा सावन सिंह जी के कथन के अनुसार ही है कि कोई वही चीज़ दे सकता है, जो उसके पास हो। यह एक साधारण सी बात है। जो लोग उधार या खाली वायदों से संतुष्ट रह सकते हैं, वे रहें ।

४०. सत्गुरु सदा वह हाथ पकड़े रहता है, जिसे एक बार वह अपने हाथों में ले लेता है। उसकी जोर की पकड़ कभी भी ढीली नहीं पड़ सकती। सत्गुरु, संसार के खत्म होने तक, न तो शिष्य को छोड़ेगा, न ही उसे भूलेगा। वह मुजस्सम (देहधारी) प्रेम का ऐसा महासागर है, जिसका कोई किनारा नहीं । प्रेम केवल देना जानता है। अतः वह देता और देता है। वह लगातार अपनी दया शिष्यों तक भेजता रहता है। जब शिष्य सत्गुरु की आंतरिक शान और

### उनका आकर्षण

आकर्षण को देखता है और पवित्र वाणी को सुनता है, तो उसे अवश्य ही प्रतिक्रिया दिखानी होगी, चाहे और लोग, जो अनजान हैं, कुछ भी कहें। यह सत्गुरु की एक देन है।

सत्गुरु सदा अपने शिष्यों के साथ है, उनके सिरों पर कार्यरत है और कभी भी उनकी आंतरिक प्रवृत्तियों और चाहतों से अनजान नहीं होता। वह कर्मों का हिसाब चुकता करने में उनकी सहायता करता है, ताकि उनको इस धरती पर दोबारा जन्म न लेना पड़े।

४१. इजहार में आई प्रभु-सत्ता, अंतर के मंडलों में, अलग-अलग सूरतों में प्रकट रहती है और इससे नामलेवाओं को जोड़ दिया गया है, प्रभु की ज्योति और दिव्य संगीत के रूप में। वह प्रभु, सत्गुरु का इंसानी चोला धारण करके इस भौतिक मंडल पर अवतरित होता है।

सत्गुरु की मौजूदगी हर सत्संग में और जहाँ कहीं भी उसे याद किया जाएगा, आत्मा की सूरत में महसूस की जाएगी। सत्गुरु की मधुर याद में बैठने का मतलब है, सत्गुरु के लिए अंतर में तीव्र चाहत और तड़प का होना और उसके प्रति गहरे प्रेम का विकास होना। सत्गुरु अपने प्यारे बच्चों से अंतर में मिलने के लिए बहुत बेचैन हैं और उन सबको लगातार अपनी दया भेजता है, ताकि वे उस तक (अंतर में) आएँ और उससे आमने-सामने होकर मिलें।

नामलेवा भाग्यशाली है कि वे इस रास्ते पर हैं। अगर वे अपने आध्यात्मिक अभ्यासों के प्रति सच्चे हैं, तो वे आशीर्वाद पाएँगे।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

आपण इतरांशी फार कमी वेळा समोरासमोर संवाद साधतो. आपल्याला असं वाटतं की थोड्या वेळासाठी आपण गोड बोलू शकतो. पण आपण जितकं बोलतो त्यापेक्षा पुष्कळ प्रमाणात आपण त्यांचा विचार करतो. अशा प्रकारे, आपल्या विचारांचा जास्त परिणाम होतो. त्यामुळे फक्त लोकांबरोबर असतानाच नाही तर इतर वेळेसही आपण स्वतःवर (आपल्या विचारांवर) लक्ष द्यायला हवं.

समजा, आपण आपल्या बॉसविषयी चांगला विचार करत नाही. जेव्हा आपण त्यांना भेटतो तेव्हा आपण आपले विचार थांबवतो आणि त्यांच्याशी आदराने बोलतो. आपण त्यांना खूपच कमी वेळासाठी प्रत्यक्ष भेटतो, पण कामाच्या ठिकाणी, घरी, प्रवासात अशा अनेक ठिकाणी आपण त्यांच्याविषयी विचार मात्र नकारात्मक करतो. नावडणाऱ्या व्यक्तीचा जास्त विचार करणं हा माणसाचा सहज स्वभाव आहे. म्हणजे, त्या आत्म्याला आपण किती निरोप पाठवतो! आपल्या मनात आपल्या बॉसबद्दल एका दिवसात साधारण एक हजार विचार येऊ शकतात. असं करणं सोपं आहे कारण आपण एका दिवसात जवळपास साठ ते सत्तर हजार विचार निर्माण करतो.

सुरेश ओबेरॉय : इतक्या विचारांमुळे आपल्याला नक्कीच दमायला होत असेल. शिवानीदीदी : हे आपण निर्माण करत असलेल्या विचारांच्या दर्जावर अवलंबून असतं. जेव्हा विचार नकारात्मक असतात तेव्हा त्यांची संख्या वाढत जाते.

जेव्हा आपण सुट्टीत सहलीला जातो तेव्हा आरामात असतो. तणावमुक्त वातावरणात आपल्या मनात चांगले विचार येतात त्यामुळे विचारांची संख्या कमी होते. थोड्या काळापुरते का असेना पण नकारात्मक विचार येण्यासाठी कारणीभूत असणाऱ्या परिस्थितीपासून आपण दूर असतो.

आपण जेव्हा बॉसबद्दल अखंड नकारात्मक विचार करतो आणि क्वचित भेटल्यावर तोंडदेखलं चांगलं बोलतो तर आपल्या नात्याचा दर्जा कसा असेल ?

सध्याच्या जगात, नात्यांमध्ये अधिकाधिक गुंतवणूक करावी लागते पण मिळणारा मोबदला खूपच कमी असतो. आपण इतरांशी खूप आपुलकीने बोलतो, एकमेकांना महागड्या भेटी देतो तरीही आपलं एकमेकांशी जमत नाही.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

सर : इंग्रजांनी चंद्रावर पाणी आणि बर्फाचा शोध लावला आहे.
आता सांगा तुम्ही यातून काय शिकलात.
गण्या : सर, आता फक्त आपल्याला दारू आणि चकणा घेऊन जायच आहे.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* नवी दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून कोणाची नियुक्ती झाली?

– रेखा गुप्ता

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### कलिंगड

फ्रीजमध्ये ठेवून थंड केलेले कलिंगड खाऊ नये. तसेच एकदा कापलेले कलिंगड पुन्हा फ्रीजमध्ये ठेवून दुसऱ्या दिवशी खाऊ नये. कारण फळ कापल्यानंतर त्यातील पौष्टिक घटक कमी होतात. म्हणून ते लगेचच खावे. तसेच अनेकजण कलिंगड खाताना त्यात मीठ टाकतात; परंतु कलिंगडामध्ये नैसर्गिकरीत्याच सोडिअम क्लोराईड, पोटॅशिअम हे क्षार असतात व मीठ टाकून अजूनच या क्षारांचे प्रमाण वाढते. म्हणून मीठ, साखर यांचा वापर न करता आहे त्या नैसर्गिक स्थितीतील पिकलेले कलिंगड कापून लगेचच खावे. शिळे फ्रीजमध्ये कापून ठेवलेले कलिंगड खाल्लयास अनेकवेळा फूड पॉयझनिंग (अन्न विषबाधा) होऊन जुलाब, उलट्या, ताप, सर्दी, खोकला हे आजार निर्माण होतात.

एकही बी नसलेले केळ हे बिनबियाचे फळ सर्वात जुने असे जागतिक फळ आहे. निसर्गाची किमया किती भारी असते. निसर्गतःच जंतुनाशक अशा वेष्टनामध्ये केळ हे फळ असते. केळ खाताना त्याची साल काढावी लागत असल्याने जंतूंची बाधा होत नाही व त्यामुळे आपोआपच सर्वांचे आरोग्य उत्तम राहते. वर्षभर मिळणारे, सर्वांच्या खिशाला परवडणारे हे फळ लहान बालकांपासून ते वयोवद्धापर्यंत सर्वांनाच आवडते. मराठीमध्ये 'केळी', संस्कृतमध्ये 'कदली' किंवा 'उरुस्तंभ', इंग्रजीमध्ये 'बनाना', तर शास्त्रीय भाषेमध्ये 'मुसा पॅराडिसिका' अशा विविध नावाने केळ ओळखले जाते.

औषधी गुणधर्म : आयुर्वेदानुसार : केळ हे मधुर, शीत व कफकारक आहे. केळामध्ये पोषणमूल्ये अनेक असल्यामुळे सकस आहारामध्येच त्याची गणना केली जाते. यामध्ये पिष्टमय पदार्थ, प्रथिने, खनिजे 'अ', 'ब', 'क', 'ड', 'ई' जीवनसत्त्वे, कॅल्शिअम व फॉस्फरस, तसेच शरीराला ऊर्जा देण्याची शक्ती व उष्मांक भरपूर प्रमाणात आहेत.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



# सूर्यग्रहणाच्या वेळी का झोपू नये?

आपल्या शास्त्रांमध्ये सूर्यग्रहणाची वेळ खूप महत्त्वाची मानली गेली आहे. शास्त्रानुसार, ग्रहणाच्या वेळी झोपणे योग्य मानले जात नाही. कारण ते आळस आणि अशुद्धतेशी संबंधित मानले जाते. धार्मिक मान्यतेनुसार सूर्यग्रहण लागते, तेव्हा जगातील चांगली ऊर्जा कमी होते आणि नकारात्मक शक्तींचा प्रभाव वाढतो. झोपताना आपले शरीर आणि मन पूर्णपणे जागृत होत नाही. त्यामुळे या नकारात्मक ऊर्जेचा परिणाम आपल्यावर होण्याची शक्यता जास्त असते. म्हणूनच या वेळी उठून भगवंताचे ध्यान करणे योग्य ठरते. जागृत राहिल्याने व्यक्ती मानसिकदृष्ट्या अधिक सतर्क आणि सुरक्षित बनते. शास्त्रांमध्ये सांगितल्यानुसार जी व्यक्ती ग्रहणाच्या वेळी कोणत्याही आवश्यक कारणाशिवाय झोपते. त्याची मानसिक आणि शारीरिक शक्ती कमी होण्याची शक्यता असते.

ग्रहणाच्या वेळी झोपल्याने मनामध्ये जडपणा आणि आळशीपणा वाढतो. त्यामुळे भविष्यात आरोग्याच्या किरकोळ समस्या उद्भवू शकतात. ज्योतिषशास्त्रानुसार सूर्य आपल्या आत्मविश्वास आणि आरोग्याचा स्वामी आहे. सूर्यग्रहण लागते आणि आपण झोपलेले नसतो तेव्हा आपल्या नशिबावर आणि उर्जेवर नकारात्मक परिणाम होत नाही. त्यामुळे झोपण्याऐवजी शांत मनाने मंत्रोच्चार आणि भगवंताच्या नामजपात हा वेळ घालवावा.

सूर्यग्रहण ही एक महत्त्वाची खगोलीय घटना आहे.

चंद्र पृथ्वी आणि सूर्य यांच्या मधोमध येतो आणि सूर्याचा प्रकाश काही काळासाठी झाकला जातो तेव्हा सूर्यग्रहण होते. ही घटना अमावस्येला घडते. खगोलशास्त्रीय दृष्टिकोनातून सूर्य, चंद्र आणि पृथ्वी यांची सरळ रेषेत मांडणी झाल्यामुळे ग्रहण तयार होते. प्राचीन काळापासून विविध संस्कृतींमध्ये सूर्य ग्रहणाला विशेष महत्त्व दिले गेले आहे. भारतात याला धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्टीनेही महत्त्व आहे. काही लोक या काळात मंत्रजप, ध्यान किंवा दानधर्म करतात. वैज्ञानिक दृष्टीने पाहता, सूर्यग्रहणामुळे सूर्याच्या बाह्य स्तरांचा अभ्यास करण्याची संधी मिळते. त्यामुळे खगोलशास्त्रज्ञांना नवीन माहिती मिळते. सूर्यग्रहण पाहताना योग्य काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. उघड्या डोळ्यांनी थेट सूर्य पाहणे धोकादायक ठरू शकते, कारण त्यामुळे डोळ्यांच्या रेटिनाला इजा होऊ शकते. म्हणूनच विशेष प्रमाणित सोलर फिल्टर असलेले चष्मे वापरणे गरजेचे आहे.

योग्य फिल्टर लावलेले असल्याशिवाय दुर्बीण, कॅमेरा किंवा दुर्बिणीसारख्या साधनांमधूनही थेट सूर्य पाहू नये. काही पारंपरिक समजुतींनुसार ग्रहणकाळात अन्न सेवन टाळावे असे मानले जाते, परंतु वैज्ञानिकदृष्ट्या त्याचा आरोग्यावर थेट परिणाम होत नाही. तरी स्वच्छता आणि सुरक्षितता राखणे महत्त्वाचे आहे. योग्य माहिती आणि काळजी घेतल्यास सूर्य ग्रहणाचा अनुभव सुरक्षित आणि ज्ञानवर्धक ठरू शकतो. विशेषत: गर्भवती महिलांसाठी झोपणे निषिद्ध मानले जाते. दरम्यान वातावरणात उपस्थित हानिकारक किरणांचा शिशूच्या आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो.

शास्त्रानुसार, ग्रहणाच्या वेळी झोपल्याने शरीराचे नैसर्गिक घड्याळ आणि पचनसंस्था बिघडण्याची शक्यता असते. या काळात जागे राहिल्याने शरीराची शक्ती कायम राहते आणि मनही शांत राहते. तथापि, शास्त्रांनी अगदी लहान मुले, आजारी लोक आणि वृद्धांना थोडा दिलासा दिला आहे. कारण त्यांच्यासाठी त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे सर्वात महत्त्वाचे आहे. नियमांचे पालन केल्याने मनात सकारात्मक विचार संचारतात.

शास्त्रानुसार, ग्रहणाच्या वेळी जागे असताना केलेल्या देवाच्या नावाचा किंवा मंत्राचा जप केल्याने सामान्य दिवसांपेक्षा अधिक फळ मिळते. झोपी गेलात तर तुम्ही या शक्तिशाली वेळेचा फायदा घेऊ शकत नाही. जागे राहिल्याने मन सावध राहते आणि देवाचे नाव घेतल्याने आपल्याभोवती एक सुरक्षा वर्तुळ तयार होते. या सरावामुळे मानसिक शांती मिळते आणि जीवनातील अडचणींवर मात करण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढते. सकारात्मक ऊर्जा मिळविण्यासाठी हा काळ सर्वात उपयुक्त मानला जातो.

## कॅलिडोस्कोप

# इंग्रजी बोलण्यात दिल्लीकर आघाडीवर!

इंग्रजी बोला म्हटले, की आपली घाबरगुंडी होते किंवा मला इंग्रजी समजते; पण बोलता येत नाही, असाच काहीसा सूर असतो. त्यातही महानगर किंवा मेट्रो सिटीमध्ये इंग्रजी बोलण्याचे प्रमाण वाढले आहे. कॉर्पोरेट कंपन्यांमध्येही इंग्रजीत संभाषण ही सर्वसाधारण बाब झाल्याचे पाहायला मिळत आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांचेही प्रमाण वाढले असून सध्याच्या पालकांची लहानपणापासूनच आपल्या मुलांना स्पष्ट आणि अस्खलित इंग्रजी बोलता यावे अशी इच्छा दिसून येते. त्यामुळे इंग्रजी माध्यमांच्या शाळेत पाल्यांना पाठवण्यात येत असल्याचे दिसते.

जगभरात सध्या इंग्रजी भाषेला अधिक महत्त्व आहे. कारण इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा मानली जाते; मात्र अनेक देशांमध्ये इंग्रजीला अधिक महत्त्व न देता त्यांच्या राष्ट्रीय भाषेतच व्यवहार आणि अभ्यासक्रम आहेत. भारतात सद्यस्थितीत हिंदी, संस्कृतनंतर सर्वाधिक बोलली जाणारी भाषा इंग्रजी बनली आहे.




जगभरातील देशांचा विचार केल्यास भारत हा इंग्रजी भाषा बोलण्यात जागतिक सरासरीपेक्षा पुढे आहे. भारतात सर्वाधिक इंग्रजी बोलले जाणारे शहर हे दिल्ली आहे. दिल्लीनंतर राजस्थान आणि पंजाबमध्ये सर्वाधिक अस्खलित इंग्रजी बोलली जात असल्याचे एका सर्वेक्षणातून समोर आले. पियरसनच्या ग्लोबल इंग्लिश प्रोफिशिएन्सी अहवालानुसार ही माहिती समोर आली आहे. दिल्लीला इंग्रजी बोलण्यात ६३ गुण मिळाले असून राजस्थान ६० तर पंजाबला ५८ गुण मिळाले आहेत.

जगभरातील देशांमध्ये ब्रिटन म्हणजे इंग्लंडमध्ये इंग्रजी बोलणारे ९८.३ टक्के लोक आहेत. अमेरिकेत ९५ टक्के नागरिक इंग्रजीत संवाद साधतात. वर्ल्ड ऑफ स्टॅटिक्सच्या डेटानुसार सर्वाधिक इंग्रजी जिब्राल्टर लोक बोलतात. येथील १०० टक्के नागरिक अस्खलित इंग्रजी बोलतात; मात्र येथील लोकसंख्या केवळ ३२,६६९ एवढी आहे. तर, भारतात केवळ २० टक्के नागरिक अस्खलित इंग्रजी बोलतात; पण लोकसंख्येच्या दृष्टीने विचार केल्यास भारत इंग्रजी बोलणाऱ्या प्रमुख पाच देशांपैकी आहे. दरम्यान, चीनमध्ये सर्वात कमी इंग्रजी भाषा बोलली जाते. चीनमध्ये केवळ ०.९ टक्के लोक इंग्रजी बोलतात. येथील नागरिक चीनी भाषेचा सर्वाधिक वापर करतात. चीनमध्ये चीनी, मंगोलियाई, तिब्बती, उइघुर आणि झुआंग भाषा बोलल्या जातात.



# बोगद्याने उडाली चीनची झोप

चीनची झोप भारताने उडवली असून यास कारणीभूत ठरत आहे तो म्हणजे एक बोगदा. भारतातली पहिल्या बुलेट ट्रेन प्रकल्पाची घोषणा झाली असून, २०२७ पर्यंत ही ट्रेन सेवेत दाखल होईल. याच बुलेट ट्रेनसाठी भारतात अंडरवॉटर टनेल अर्थात पाण्याखाली असणाऱ्या बोगद्याची निर्मिती करण्यात येत आहे. जवळपास १९ हजार कोटी रुपये इतकी मोठी रक्कम खर्चून हा आश्चर्यकारक बोगदा बांधण्याचे काम चीनच्याच सीमेनजीक होत आहे.

भारताच्या या अंडरवॉटर टनेलमुळे चीनच्या सीमेपर्यंत पोहोचणे सोपे होत असून या रेल्वे प्रकल्पाअंतर्गत २० मिनिटांमध्ये तब्बल २४० किलोमीटर इतके अंतर अमर्याद वेगाने गाठता येणार आहे. आसाममध्ये ब्रह्मपुत्रा नदीच्या अंतर्गत भागात हा बोगदा तयार करण्यात येत असून, सहा तासांचा प्रवास यामुळे अवघ्या २० मिनिटांत पूर्ण करता येणार आहे. ३३.७ किलोमीटर अंतराच्या या बोगद्यामुळे गोहपूर (एनएच-१५)- नुमालीगढ (एनएच-७१५) ही ठिकाणे जोडली जाणार आहेत.

भारतातील पहिल्या आणि जगातील दुसऱ्या अशा या अंडरवॉटर रोड कम रेल टनेल प्रकल्पात एकाच बोगद्यामध्ये रस्ता आणि रेल्वेमार्गही असेल. म्हणजे वाहने आणि ट्रेन एकाच वेळी प्रवास करतील. इंजिनीयरिंग-प्रोक्योरमेंट-कंस्ट्रक्शन (ईपीसी) च्या माध्यमातून हा प्रकल्प आकारास आणला जात आहे. ट्विन ट्युब टनल असे या बोगद्याला संबोधण्यात येत असून यासाठीचा खर्च १८ हजार ६६२ ते १९ हजार कोटी रुपयांच्या दरम्यान जाईल असेही म्हटले जात आहे.

# अनोखं कुंड

भारतासह जगभरातच अनेक रहस्यमय कुंडं आहेत. काही कुंडांमधलं पाणी गरम असतं तर काही कुंडांमध्ये स्नान केल्याने त्वचारोग बरे होतात असंही म्हटलं जातं. मात्र या कुंडांमागचं रहस्य अजूनही उलगडलेलं नाही. असंच एक चमत्कारी कुंड झारखंडमध्ये आहे. इथल्या बोकारो जिल्ह्यातल्या या कुंडाचं रहस्य भूगर्भशास्त्रज्ञांनाही उलगडता आलेलं नाही. या कुंडाजवळ उभं राहून जोरात टाळ्या वाजवल्या की त्यातलं पाणी आपोआप वर येऊ लागतं, असं म्हणतात. एखाद्या भांड्यात उकळणाऱ्या पाण्यासारखं हे दृश्य असतं. दलाही कुंड या नावाने ते प्रसिद्ध आहे. हे कुंड सिमेंटच्या भिंतींनी वेढलं आहे. कुंडातलं पाणी उन्हाळ्यात थंड तर हिवाळ्यात गरम असतं. हा विरोधाभास का, याचाही थांग कोणाला लावता आलेला नाही. या कुंडातल्या पाण्यामुळे



चर्मरोग दूर होत असल्याचं लोकांचं म्हणणं आहे. या पाण्यात गंधक आणि हिलियम वायू असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. दर संक्रांतीला इथे जत्रा भरते. या ठिकाणी लाखोंच्या संख्येने लोक उपस्थित असतात.

# जगाला विनाशापासून वाचवण्यासाठी गाईची निर्मिती

जगाच्या विनाशाबद्दल लोक अनेक वर्षांपासून चर्चा करत आहेत. पृथ्वीच्या नाशाची वेगवेगळी कारणे लोक देतात. शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे, की पृथ्वीवर ज्या प्रकारे हवामान बदल होत आहेत, त्यामुळे आजपासून शेकडो वर्षांनी पृथ्वीवर जगणे कठीण होईल. या संदर्भात शास्त्रज्ञ गायीला पृथ्वीवरील हवामान बदलाचे एक कारण मानतात. याबाबत आता शास्त्रज्ञांनी जगाला विनाशापासून सावध करण्यासाठी एक अनोखी गाय तयार केली आहे.



गाईच्या दंशातून विषारी मिथेन वायू बाहेर पडतो, हा हरितगृह वायू आहे, जो पृथ्वीला तापवण्याचे सर्वात मोठे कारण मानले जाते. त्यामुळे पृथ्वी सतत गरम होत आहे. अशा स्थितीत स्कॉटलंडच्या शास्त्रज्ञांनी अशी गाय विकसित केली आहे, जी फार कमी वेळा ढेकर देईल आणि मिथेन वायू फारच कमी सोडेल. यामुळे जगात विनाश घडवून आणणारा काळ वाढवण्याचा प्रयत्न केला जाईल.

गायीचे वासरू भविष्यात जगाला विनाशापासून वाचवेल, अशी चर्चा आहे. अशा आणखी बछड्यांमध्ये बदल करण्याचा शास्त्रज्ञ विचार करत आहेत. हिल्डा नावाच्या या वासराला ग्रीन हाऊस इफेक्टविरोधी म्हटले जात आहे. एकीकडे जगभरातील गायी मिथेन वायूने पर्यावरणाची हानी करत असताना, हे वासरू हरितगृह परिणाम कमी करण्यास मदत करत आहे.

शास्त्रज्ञ अशा बदलांचा विचार करत आहेत, की त्यातून उत्सर्जित होणारा वायू पूर्णपणे शून्य होतो. जगाच्या हरितगृह वायू उत्सर्जनांपैकी सुमारे पाच टक्के गुरे तयार करतात, म्हणून संशोधक त्यांचा प्रभाव कमी करण्याचे मार्ग शोधण्यात व्यस्त होते. त्याअंतर्गत हिल्डा विकसित करण्यात आली.

# संसार मोडू नका!

राजस्थान उच्च न्यायालयाने ७५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या दांपत्याच्या ५८ वर्षे जुन्या विवाहबंधनाला तडा देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. न्यायमूर्ती सुदेश बंसल आणि न्यायमूर्ती अनिल कुमार उपमन यांच्या खंडपीठाने कुटुंब न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध पतीने दाखल केलेले अपील फेटाळून लावत हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

न्यायालयाने स्पष्ट केले, की वैवाहिक जीवनात किरकोळ मतभेद, वाद-विवाद आणि चढ-उतार हे स्वाभाविक असतात; मात्र अशा सामान्य घटनांना क्रूरता म्हणून दाखवत घटस्फोटाचा आधार बनवणे योग्य नाही. विशेषतः या वयात घटस्फोट मंजूर केल्यास केवळ पत्नीच नाही, तर संपूर्ण कुटुंबावर त्याचा नकारात्मक परिणाम होईल. समाजातील सर्व सदस्यांच्या सन्मान आणि प्रतिष्ठेलाही धक्का पोहोचू शकतो असेही न्यायालयाने नमूद केले.

या दांपत्याचा विवाह २९ जून १९६७ रोजी झाला. २०१३ पर्यंत त्यांनी तब्बल ४६ वर्षे कोणतीही तक्रार नोंदवता एकत्र संसार केल्याचे पतीने स्वतः २६ मे २०१४ रोजी दाखल केलेल्या घटस्फोटाच्या याचिकेत मान्य केले होते. न्यायालयाने निरीक्षण केले, की इतका दीर्घ कालावधी एकत्र राहिल्यानंतर आणि वाढत्या वयानुसार मानसिक परिपक्वता व सहनशीलता वाढलेली असते. सुरुवातीच्या अडचणी कालांतराने परस्पर समजुतीने सोडवता येतात. पतीने दावा केला, की २०१४ मध्ये पत्नीने त्यांच्याविरुद्ध हुंडाबळीची फिर्याद दाखल केली होती. पोलिसांनी चौकशीनंतर खोटी ठरवून ती बंद केली. त्यामुळे त्यांना सामाजिक अपमान सहन करावा लागला. तसेच पत्नी सर्व स्थावर मालमत्ता फक्त मोठ्या मुलाच्या नावावर करायला इच्छुक असल्याचा आरोप त्यांनी केला. स्वतः मात्र दोन्ही मुलांमध्ये समान वाटणी व्हावी अशी त्यांची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. पत्नी मोठ्या मुलाच्या प्रभावाखाली असून त्यांची काळजी घेत नाही तसेच इतर महिलांशी संबंध असल्याचे खोटे आरोप करते असेही त्यांनी म्हटले.



# चिमुकलीमुळे वाचले पाच जीव



केरळीमधील पठाणमथिट्टा जिल्ह्यातील मल्लापल्लीमधील एलिन शेरीन अब्राहम या १० महिन्यांच्या चिमुकलीचा ५ फेब्रुवारीला अपघात झाला. ती, आई आणि आजी आजोबांसोबत कोट्टायमहून तिरूवल्लाला कारमधून जात होती, पण नियतीच्या मनात काही वेगळंच होतं. एमसी रोडवर या कारला भीषण अपघात झाला. एका दुसऱ्या कारने तिला समोरासमोर धडक दिली. त्यात आई, आजी आणि आजोबांबरोबर तीही गंभीर जखमी झाली. या दुर्घटनेनंतर एलिनला चांगनासेरी आणि तिरुवल्ला येथील रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले; पण पुढील उपचारासाठी तिथल्या डॉक्टरांनी तिला कोची येथील अमृता रुग्णालयात हलवलं. इथे उपचारादरम्यान १३ फेब्रुवारीला डॉक्टरांनी तिला मेंदूमृत घोषित केलं आणि कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला.

१० महिन्यांच्या चिमुकलीचं आयुष्य आता कुठे सुरु झालं होतं. आई वडिलांसाठी यापेक्षा मोठं दु:ख नाही. पालकांना खूप मोठा धक्का बसला होता, पण या अशा क्षणीदेखील या पालकांनी घेतलेल्या निर्णयामुळे सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. वडील अरुण अब्राहम आणि आई शेरीन एन. जॉन आपल्या मुलीचे अवयव दान करून इतरांना जीवनदान देण्याचा निर्णय घेतला. मिळालेल्या माहितीनुसार त्या मुलीचे यकृत, दोन मूत्रपिंडं, हृदय आणि दोन डोळे दान करण्यात आले. त्यामुळे पाच जणांना जीवनदान मिळाले.

# एक गूढ बेट

पाकिस्तानमध्ये मध्यंतरी एक विचित्र घटना घडली. इथलं एक बेट अचानक गायब झालं. एका रात्रीत बेट गायब झाल्यामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. २०१३ मध्ये पाकिस्तानमध्ये आलेल्या प्रलयंकारी भूकंपानंतर हे बेट पहिल्यांदा समोर आलं होतं. मात्र आता सहा वर्षांनंतर ते पुन्हा गायब झालं आहे. अंड्याच्या आकाराचं हे बेट २९५ फूट लांब आणि १३० फूट रूंद होतं. समुद्रसपाटीपासून ते ६० फूट उंच होतं. इथले लोक या बेटाला जलजला कोह असं म्हणायचे. जलजला कोह म्हणजे भूकंपामुळे निर्माण झालेला पर्वत. भूकंपादरम्यान टेक्टोनिक प्लेट्सची टक्कर झाल्यामुळे या बेटाची निर्मिती झाल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. भूकंपानंतर हे बेट अचानक दिसू लागलं. यामुळे या परिसरातले लोक पुरते गोंधळून गेले. हे नेमकं काय आहे, हे कोणालाच कळत नव्हतं. मग काही लोक नावेने या बेटाजवळ पोहोचले. या ठिकाणी भरपूर चिखल, माती आणि दगड असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. तसंच काही भागातून मिथेन वायूही बाहेर पडत असल्याचं दिसून आलं. नासाने या भागातले काही फोटो जारी केले आहेत. त्यात हे बेट कुठेच दिसत नाही. त्यामुळे हे बेट गायब झाल्याची चर्चा सुरू आहे. मात्र ६०-७० वर्षांपूर्वीही अशीच एक घटना घडल्याचं काही लोकांचं म्हणणं आहे. हे गूढ आता शास्त्रज्ञांनीच उलगडायला हवं.






# नका करू नासाडी

अनेकजण ताटात घेतलेलं अन्न वाया घालवतात. लग्न किंवा समारंभांमध्ये अन्नाची खूप नासाडी होते. जगभरातली बरीच मोठी लोकसंख्या एक वेळच्या अन्नापासून वंचित असताना होणारी अन्नाची ही नासाडी आपल्याला अस्वस्थ करून सोडते. ही नासाडी रोखण्याचे उपाय काहीजण करतात. अन्न टाकलं नाही तर काही टक्के सवलत देण्याच्या योजना राबवल्या जातात. लोकांना अन्नाचं महत्त्व कळावं यासाळी प्रयत्न होतात. असाच एक प्रयत्न राजस्थानमधल्या जोधपूरमध्ये करण्यात आला आहे. इथे विशेष थाळ्या बनवून घेण्यात आल्या आहेत. लोकांनी अन्न टाकू नये, यासाठी शहरात मोहीम राबवली जात आहे. केटरर्सनी आपल्या थाळ्यांवर ताटात अन्न टाकू नका असे शब्द कोरले आहेत. प्रत्येक थाळीवर हे शब्द कोरण्यात आले आहेत. त्यामुळे या थाळ्या हाती घेतल्यावरच अन्नाची नासाडी न करण्याचा संदेश लोकांपर्यंत पोहोचू शकेल. जोधपूरमध्ये या मोहिमेला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे अन्नाची नासाडी करू नका असे शब्द कोरलेल्या दोन टन स्टीलपासून जवळपास १० हजार थाळ्या तयार करून घेण्यात आल्या आहेत. सर्वात आधी कुंथूनाथ जैन मंदिरातल्या जयंतीलाल पारेख यांनी एक हजार थाळ्या तयार करून घेतल्या. त्यांनी महाराष्ट्रात अशा प्रकारच्या थाळ्या पाहिल्या होत्या. पारेख यांच्या प्रयत्नांनंतर आता परिसरातल्या विविध समाजांनीही अन्नाची नासाडी टाळण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

